ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. P. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ पुणें, बुधवार तारीख ६ फेब्रुवारी, १९५७ अंक ५

## विविध माहिती

**भारताला डेन्मार्कची मदत**—डेन्मार्कच्या उद्योगपतींचें एक मंडळ भारताचा १८ दिवसांचा दौरा करण्यासाठी आलें होतें. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला डेन्मार्क यंत्र-साहित्याची व तांत्रिक ज्ञानाची मदत करूं शकेल असें मंडळाच्या नेत्यानें सांगितलें. दूधदुभत्याचा धंदा, डिझेल एंजिनें, मच्छीमारीच्या बोटी, इत्यादि साहित्य डेन्मार्क देऊं शकेल असें ते म्हणाले.

**कॅन्सरवर उपाययोजना**—कॅन्सरवर उपचार करून तो बरा करण्याच्या उपायांची चर्चा करण्यासाठी लंडन येथें डॉक्टर्सची व आरोग्यतज्ज्ञांची परिषद भरली होती. लंडनमधील प्रसिद्ध शस्त्रक्रिया-वैद्य डॉ. रॅव्हन ह्यांनीं हा रोग नियंत्रित करतां येईल असा विश्वास प्रकट केला. पण अजून पुष्कळच काम व्हावयास पाहिजे असाहि विचार त्यांनीं बोलून दाखविला.

**रस्त्यांच्या विकासासाठी मदत**—आंध्र, मुंबई, मणिपूर व उत्तर प्रदेश ह्या राज्यांतील रस्त्यांच्या विकासासाठी भारतीय सरकारनें १६,७२,००० रुपये मंजूर केले आहेत. आंध्र राज्यांतील संकल्पित रस्त्यावर छोटे-मोठे पूलहि बांधण्यांत यावयाचे आहेत. ह्या कामासाठी १,१६,९०० रुपये वेगळे मंजूर करण्यांत आले आहेत.

**पाकिस्तानांत अमेरिकन भांडवल**— पाकिस्तानांतील कांहीं उद्योगपतींनीं अमेरिकन भांडवल देशांत यावें म्हणून जोराच्या खटपटी चालविल्या आहेत. खटपटींना कांहीं प्रमाणांत यश आलें असून दोन अमेरिकन कंपन्यांनीं पाकिस्तानांतील औषधाच्या व इतर कंपन्यांत १ कोटी डॉलर्स भांडवल गुंतविण्याचा करार केला आहे.

**माटुंगा वर्कशॉपची पुनर्घटना**— मध्य रेल्वेच्या माटुंगा येथील वर्कशॉपची पुनर्घटना करण्याचें ठरलें आहे. या कामासाठी २३ लाख रुपये लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत वर्कशॉपवर पडणाऱ्या कामांत बरीच वाढ होईल. जादा ताण सहन करण्यासाठी पुनर्घटना आवश्यक वाटत आहे.

**विविध व्यावसायिक शाळा**—मुंबई सरकारनें दोहद येथें एक विविध-व्यावसायिक शिक्षणसंस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. संस्थेंत एंजिनिअरिंगच्या तीन शाखांचें शिक्षण देण्यांत येईल. संस्था स्थापन करण्यासाठी सरकारला १५ लाख रुपये खर्च करावा लागेल. १९५७ च्या जूनपासून संस्थेच्या कार्यास प्रारंभ होईल.

**राहुरी येथील साखरेचा कारखाना**—अहमदनगर जिल्ह्यांत काढण्यांत येणाऱ्या सहकारी साखरकारखान्यांपैकी राहुरी येथील तिसरा सहकारी कारखाना येत्या मार्च महिन्यापासून उत्पादनास प्रारंभ करील. दररोज १,००० पोतीं साखर तयार करण्याच्या शक्तीची यंत्रसामुग्री कारखान्यांत बसविण्यांत आली आहे.

**बोटीवरील औद्योगिक प्रदर्शन**— जपानमध्यें तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या यंत्रसामुग्रीचे नमुने घेऊन ‘निशो-मारू’ ही जपानी बोट आशिआंतील कांहीं देशांचा दौरा करीत आहे. हें तरतें प्रदर्शन पहाण्यासाठी बोट मुंबईमधील अलेक्झांड्रा गोदींत असतांना ८,००० लोक गेले होते. भारताच्या निरनिराळ्या भागांतील बरेच उद्योगपतीहि प्रदर्शन पाहून गेले.

**वीज-केंद्रासाठी हंगेरिअन यंत्रसामुग्री**— काश्मीरमध्यें एक वीज निर्मिति-केंद्र निर्माण करण्यासाठी परदेशांकडून यंत्रसामुग्रीचीं टेंडर्स मागविण्यांत आलीं होतीं. त्यांची तपासणी करण्यांत येऊन काश्मीरच्या सरकारनें ४० लाख रुपये किंमतीच्या यंत्रसामुग्रीची मागणी एका हंगेरिअन कंपनीकडे नोंदविली आहे.

**पगारांच्या श्रेणींची पुनर्घटना**—नव्यानें बनविण्यांत आलेल्या म्हैसूरच्या राज्यांत सरकारी नोकरांच्या पगारांच्या चार श्रेणी सध्यां प्रचलित आहेत. म्हैसूरच्या सरकारनें आतां नवा हुकूम काढून श्रेणींत व भत्त्यांत एकसूत्रीपणा आणला आहे. पगारांच्या श्रेणींची पुनर्घटना करण्यांत आल्यानें राज्य सरकारला दरसाल ४ कोटी रुपये अधिक खर्च येणार आहे.

**श्री. नवल टाटांची टीका**—उद्योगपति श्री. नवल टाटा पंजाबच्या दौऱ्यावर असतांना पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत असें म्हणाले कीं, भारतीय सरकारच्या उद्योगधंद्याबाबतच्या धोरणामुळें खाजगी मालकीचे उद्योगधंदे बुडतील. ज्या धंद्यांना संरक्षणाच्या दृष्टीनें महत्त्व आहे, तेवढेच उद्योगधंदे सरकारी नियंत्रणाखालीं असावे.

**रेल्वेला लागणारें सामान**—भारतीय रेल्वेला गेल्या सालीं जितकें सामानसुमान लागलें त्यापैकीं ८२ टक्के वस्तू देशांतील कारखान्यांतून तयार झालेल्या होत्या, अशी माहिती पश्चिम रेल्वेचे नियंत्रक मि. रॉबिन्सन ह्यांनीं सांगितली. गेल्या कांहीं महिन्यांत झालेले अपघात लक्षांत घेऊन रेल्वेला पुरविण्यांत येणाऱ्या साहित्याची कसून तपासणी करण्यांत यावी, असे हुकूम देण्यांत आले आहेत.

## रिझर्व्ह बँकेचा रोख्यांच्या तारणावरील कर्जांच्या व्याजाचा दर वाढला

### मासुली बँकरेट ३½% कायम !

१ फेब्रुवारी पासून रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांना द्यावयाच्या (सरकारी रोख्यांच्या व इतर मंजूर तारणावर) कर्जावरील व्याजाचा दर वाढवून ४% केला आहे. बँकरेट आणि मंजूर रोख्यांच्या तारणावरील व्याजाचा दर ह्यांत फरक प्रथमच करण्यांत आला आहे, आणि बँकरेट हा पूर्वीप्रमाणें ३½% च कायम आहे. तथापि, व्यवहारतः बँकरेटच ४% झाला असल्यासारखा आहे. रिझर्व्ह बँकेच्या घोषणेप्रमाणें, बिलमार्केटयोजनेखालील कर्जावरील व्याजाचा दर ३½% कायम आहे, परंतु तो वस्तुतः आतां ४% च पडावयास जातो. कारण, १ फेब्रुवारी १९५७ पासून वाढलेली स्टँप ड्यूटी अंमलांत आली आहे व त्या स्टँप ड्यूटीचा बोजा बँकांवरच पडत आहे. त्याकारणानें, बिलमार्केट योजनेखाली हुंड्यांच्या तारणावर रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेण्यापेक्षा सरकारी रोख्यांच्या तारणावर तें घेणें स्वस्त पडलें असतें. ही विसंगति रिझर्व्ह बँकेनें दूर केली आहे. बँका आपल्या कर्जदारांकडून ज्या दरानें व्याज घेतात, तो दर ह्यामुळें ½ ते १% वाढला जाणार, हें उघड आहे. सरकारी रोख्यांच्या किंमतींत थोडी घट होण्याचा संभव दिसतो.

बँक ऑफ इंग्लंडनें बँकरेट वाढविला, तेव्हां रिझर्व्ह बँकेचा बँकरेट कांहीं वाढविण्यांत आला नाहीं. त्या दोहोंत २% दराचा फरक पडला. ब्रिटिश एक्स्चेंज बँका त्यांच्या भारतांतील येण्यांच्या जिंदगीचे तारणावर ग्रेट ब्रिटनमध्यें ओव्हरड्राफ्ट घेतात. तो भागविण्यासाठी भारतांतच ठेवी घेऊन त्या रकमा ग्रेट ब्रिटनकडे धाडण्यासाठी त्या बँका हुंडणाजवळ खरेदी करीत असत. त्या कारणानें, ग्रेटब्रिटनकडे हिंदी पैशाचा ओघ चालू होता. दर बुधवारीं बाजारांत बातमी असे, कीं आतां रिझर्व्ह बँकेचा बँकरेट वाढणार ! तथापि, बँक ऑफ इंग्लंडच आपला बँकरेट उतरविणार असल्याच्या बातम्याहि येत होत्या. पण तो दर ५½% कायम राहिला आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सरकार १२०० कोटी रुपये कर्जाच्या रूपानें उभारणार आहे, त्यापैकीं १,००० कोटी रुपये अद्याप जमा करावयाचे आहेत. ही कर्जउभारणी आतां महाग जाणार. म्हणजे, सरकारला जास्त व्याज द्यावें लागणार असा अंदाज आहे.

---

### मोटारींच्या धंद्याला संरक्षण

देशी मोटारींच्या विक्रेत्यांचें कमिशन कमी करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. कार व जीप गाड्या विक्रेत्यांना कारखान्यांतील किंमतीच्या १० टक्के एवढेंच कमिशन मिळेल. तसेंच ट्रक, बस व इतर व्यापारी वाहतुकीचीं वाहनें ह्यांच्या बाबतींत ते ७॥ टक्केच मिळेल.

टॅरिफ कमिशननें केलेल्या शिफारशींचा विचार करून सरकारनें हा निर्णय जाहीर केला आहे. ह्या धंद्याला पुढील दहा वर्षें संरक्षण देण्याची कमिशनची शिफारस सरकारनें मान्य केली आहे. तथापि, आयातीवरील अनेक बंधनें लक्षांत घेतां देशी धंद्याला सध्यांहि पुरेसें संरक्षण असल्यामुळें जकातींत कांहीं बदल करावेत असें सरकारला वाटत नाहीं. मोटारधंद्याच्या वाढीच्या इतर शिफारशीहि सरकारनें मान्य केल्या आहेत.

## पुढे पाऊल

[लेखक : श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ', दुर्गाधिवास, पुणें ४].

श्री. काळे यांनीं सुमारें तीन वर्षांपूर्वी "कण आणि क्षण" हें पुस्तक लिहिलें आणि तें इतकें लोकप्रिय झालें कीं, दोन वर्षांत त्याच्या दोन आवृत्त्या निघाल्या. त्याच्या गुजराती अनुवादाचेंहि तसेंच उत्कृष्ट स्वागत झालें. आतां श्री. काळे यांनीं याच धर्तीचें हें दुसरें पुस्तक लिहिलें आहे, आणि तेंहि पहिल्याइतकेंच वाचकवर्गाला आकर्षक वाटेल अशी खात्री वाटते. या संग्रहांत १६ लेख एकत्रित करण्यांत आले आहेत. या लेखांत जितकें लालित्य, चित्तवेधकत्व व व्यवहारज्ञान भरलें आहे तितकेंच हे लेख समाजघटकांना बोधप्रद व मार्गदर्शक होणारे आहेत. पाहुण्यांचा प्रश्न, शेजारी, मिळवती बायको, स्त्रीपुरुषांचे परस्पर संबंध, तरुण पिढी, वरसंशोधन, सामाजिक नीतीचा वाढता ऱ्हास, अशा विविध विषयांवर लघुनिबंधांच्या धर्तीवर लिहिलेले हे ललितलेख वाचतांना प्रत्येक वाचकाला त्यांत आपल्या अनुभवांचें प्रतिबिंब पडलेलें आढळेल आणि त्यांतच लेखकाच्या लेखणीचें खरें कौशल्य आहे. सुखी जीवनाच्या पाऊलवाटा दाखविणारें हें पुस्तक प्रत्येक कुटुंबांत अवश्य वाचलें गेलें पाहिजे. पृ. १३२. किं. २ रु.

—चित्रमयजगत्, फेब्रुवारी, १९५७

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय,

### "भारताची खनिजसंपत्ति" विभाग

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या विद्यमानें प्रतिवर्षीं सुप्रसिद्ध भारतीय उद्योगपती कै. जमशेटजी टाटा यांचा जन्म दिवस दि. ३ मार्च रोजीं साजरा करण्यांत येत असतो.

येत्या ३ मार्च, १९५७ रोजीं या जन्म-दिनानिमित्त संग्रहालयांत भारताची खनिजसंपत्ति हा विभाग उघडण्यांत येणार आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळांत भारतीय खनिज संपत्तीचें उत्पादन व खनिज पदार्थांवर अवलंबून असणाऱ्या उद्योगधंद्यांतील उत्पादन यांत अत्यंत झपाट्यानें वाढ होत आहे. अनेक मोठमोठे उद्योगधंदे खनिज पदार्थांवर अवलंबून असतात. या दृष्टीनें खनिज पदार्थांचें अतिशय महत्त्व आहे. भारतांतील वेगवेगळ्या राज्यांत उपलब्ध असलेल्या खनिज पदार्थांसंबंधीं सामान्य जनतेला व विशेषतः विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या दृष्टीनें हा विभाग उघडण्याचें संग्रहालयाच्या विश्वस्त समितीनें ठरविलें आहे. या कामीं भारत सरकार व इतर राज्य सरकारें व खाणी मालक यांचेकडून संग्रहालयास चांगल्या प्रकारें साहाय्य मिळत आहे.

---

### बॉम्बे को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनल

बॉम्बे को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलची बैठक पुणें येथें ४ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी, १९५७ पर्यंत भरणार आहे. पुणें, उत्तर सातारा, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यांतील अर्ज व अपिलें यावेळीं ऐकलीं जातील.


**कण आणि क्षण**

(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

# अर्थ

बुधवार, ता. ६ फेब्रुवारी, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## उद्योगपतींची सहकार्याची तयारी

बिहार चेंबर ऑफ कॉमर्सची २९ वी सर्वसाधारण वार्षिक सभा पाटणा येथें भरली होती. ह्याप्रसंगीं भाषण करतांना चेंबरचे अध्यक्ष श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांनीं असें सांगितलें कीं भारतीय सरकारनें देशाच्या आर्थिक विकासाच्या ज्या अनेक योजना आंखल्या आहेत त्या पूर्ण करण्याच्या कामीं भारतीय उद्योगपती व व्यापारी सर्व प्रकारचें सहकार्य देण्यास तयार आहेत. देशांतील दुसऱ्या कोणत्याहि वर्गापेक्षा ह्या वर्गाची आस्था व उत्साह कमी असेल असें मानण्याचें कारण नाहीं. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडतांना खाजगी मालकीच्या विभागानें जी कामगिरी केलेली आहे ती सर्वांनीं मान्य केलेली आहे. देशाच्या वाढत्या गरजा भागविण्याचें काम ह्याहीपुढें अशाच रीतीनें चालू ठेवण्याचें खाजगी उद्योगधंद्यांचें धोरण आहे. मात्र हें करण्यासाठी त्यांना जरूर ती साधनसंपत्ति आणि स्वातंत्र्य हीं मिळणें आवश्यक आहे वाढत्या गरजा पुऱ्या करण्यासाठी सार्वजनिक मालकीच्या व खाजगी मालकीच्या अशा दोन्ही विभागांच्या साधनसंपत्तीच्या मागण्या पुऱ्या करण्यांत आल्या पाहिजेत. तथापि, खाजगी मालकीच्या विभागाच्या ह्यासंबंधींच्या मागण्याकडे दुर्लक्ष करून सार्वजनिक मालकीच्या विभागाच्या मागण्या पूर्ण करण्यांत आल्या तर त्यामुळें ह्या प्रश्नाची योग्य रीतीनें सोडवणूक होणार नाहीं. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभीं भारताची जी परिस्थिति होती त्यामानानें सध्यांची परिस्थिति पुष्कळच मजबूत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जीं उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं आहेत तीं खूपच उच्च आहेत. तीं गांठण्यासाठी समाजांतील सर्व वर्गांनीं निश्चयपूर्वक प्रयत्न करणें अगत्याचें आहे; एरव्हीं तीं प्रत्यक्षांत उतरणें कठीण जाईल.

## भारतीय रेल्वेमार्गांवर तेलाचीं एंजिनें

भारतीय रेल्वेच्या कांहीं मार्गांवर तेलाच्या साह्यानें धावणारीं एंजिनें वापरण्यांत येणार आहेत. अशा प्रकारच्या एंजिनांच्या पुरवठ्यासाठी जगांतील निरनिराळ्या उद्योगप्रधान देशांकडून टेंडर्स मागविण्यांत आलीं होतीं. आलेल्या टेंडर्सची तपासणी आतां पुरी झालेली असून लवकरच १०० एंजिनांसाठी मागण्या नोंदविण्यांत येतील. पंचवार्षिक कार्यक्रमाच्या तिसऱ्या वर्षी कांहीं एंजिनें भारतांत येऊं लागतील असा अंदाज आहे. तेलावर चालणारीं एंजिनें वापरण्याची जी योजना भारतीय रेल्वेनें तयार केली आहे तीसाठी जागतिक बँकेकडून साह्य मिळण्याचाहि संभव आहे. गेल्या आठवड्यांत बँकेच्या रेल्वेविषयक तज्ज्ञांचा एक मेळावा दिल्ली येथें भरला होता. भारतीय रेल्वेच्या कांहीं भागांत वाफेच्या एंजिनांची संख्या वाढविणें अशक्य आहे. तेलावर चालणारीं एंजिनें वापरल्यामुळें ही गर्दी पुष्कळशी कमी करतां येणार आहे. वजन ओढण्याची पात्रता आणि वेग ह्या दोन्ही बाबतींत तेलावर धांवणारीं एंजिनें अधिक कार्यक्षम असतात, इतकेंच नाहीं तर तीं खर्चाच्या बाबतींतहि स्वस्त पडतात. एका डिझेल एंजिनाला दरसाल सुमारें ३०० टन तेल इंधन पुरवावें लागतें तर वाफेवर चालणाऱ्या एंजिनाला ३,००० टन कोळसा जळणासाठी लागतो. तथापि डिझेल तेलावर चालणारीं एंजिनें वापरण्यावर भारताला मर्यादा घालणें आवश्यक आहे. कारण भारतामधील खनिज तेलाची निर्मिति पुरेशी नाहीं. तेलावर चालणारीं सर्व एंजिनें आलीं म्हणजे त्यांना दरसाल सुमारें ३,००० टन तेल पुरवावें लागेल. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १,३०० मैल मार्गांवरच हीं एंजिनें वापरण्याचें ठरलें आहे.

## परदेशी कामगार कामावर घेण्यास विरोध

ब्रिटनमधील उद्योगधंदे आणि आर्थिक जीवन कोळशाच्या खाणींच्या उत्पादनावर मोठ्या हिश्यानें अवलंबून आहे हें सांगण्याचें कारणच नाहीं. अर्थातच, कोळशाच्या उत्पादनांत कोणत्याहि कारणानें घट होऊं लागेल तर ती ब्रिटनला अनर्थावह आहे. पण अशाच प्रकारचा अनवस्था प्रसंग ब्रिटनवर ओढवूं पाहात आहे. ब्रिटनमध्यें पूर्वी अधिकारावर असलेल्या समाजवादी सरकारनें कोळशाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण केलेलें आहे, आणि तसें करून एकप्रकारें उत्पादनाच्या कामांत कामगारांच्या उत्साही सहकार्याला आवाहन केलेलें आहे. पण अनुभव मात्र उलट येत आहे. वेल्समधील कित्येक खाणींत काम करण्यासाठी पुरेसे मजूर मिळत नाहींत. त्यामुळें त्या खाणी बंद कराव्या लागण्याचा संभव निर्माण झाला आहे. ब्रिटनचें नॅशनल कोल बोर्ड मिळतील ते मजूर कामावर घेऊन खाणी चालू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. वेल्समधील कोळशाच्या खाणींत काम करण्यासाठी २,००० हंगेरिअन मजूर तयार आहेत. त्यांना कामावर घेतलें तर कामगारांचा तुटवटा थोडाबहुत भरून निघेल. पण परदेशीय मजुरांना कामावर घेण्यास ब्रिटनमधील मजूर संघटना विरोध करीत आहेत. कामगार संघटनेच्या नऊ संस्थांनीं विरोधी ठराव मंजूर केले आहेत. ह्या प्रकरणीं कामगारांपैकीं कांहीं लोक मोठा गमतीचा युक्तिवाद करीत आहेत. हंगेरिअन कामगारांनीं ब्रिटनमध्यें येण्याऐवजीं नुकत्याच झालेल्या बंडाळयांत भाग घ्यावयास पाहिजे होता, असें सुचविण्यांत येत आहे. खुद्द ब्रिटनमधील हजारों नागरिक आपला अभ्युदय साधण्यासाठी ब्रिटनच्या वसाहतींत जाण्याची परवानगी मागत असतां वरील युक्तिवाद फुसका वाटल्यास नवल नाहीं.

## आगगाड्यांतील गर्दी वाढणार

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आगगाड्यांतील गर्दी कमी होण्याचा मुळींच संभव नाहीं; उलट ती वाढण्याचीच खात्री दिसते. कारण, उतारूंची संख्या ३०% वाढेल असा अंदाज असला तरी त्यांपैकीं १५% चीच सोय दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत केलेली आहे. मालाच्या वहातुकीची गति वाढविण्यास योजनेनें प्राधान्य दिलेलें आहे.

# भारताच्या परराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांचा आढावा

परराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत वाढावा उरावा, ह्या दृष्टीनें प्रत्येक देशाचा प्रयत्न चालतो. ह्या आर्थिक व्यवहारांत मालाची आयात व निर्गत ह्यांस महत्त्वाचें स्थान असलें, तरी इतरहि अनेक व्यवहार हिशेबांत घ्यावे लागतात. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशासाठी, भारताच्या परराष्ट्रांशीं होणाऱ्या व्यवहारांची परिस्थिति अनुकूल असणें अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीनें, निर्गतीस उत्तेजन, आयातीवर बंधनें, आयात भांडवली मालाच्या वापराची छाननी, इत्यादि मार्गांनीं सरकार प्रयत्न करीत आहे.

ह्या हिशेबांतील तीन प्रमुख बाबी म्हणजे ( १ ) माल व कामगिऱ्या ह्यांची देवघेव, ( २ ) देणग्या आणि ( ३ ) गुंतवणुका व चलनविषयक सोनें, ह्या होत. त्यांपैकी माल व कामगिऱ्या ह्यांच्या देवघेवीस सर्वांत जास्त महत्त्व आहे. प्रत्यक्ष मालाची आयात व निर्गत ही सहज दिसून येते, त्यांचे परिणाम हिशेबांत चलनाच्या स्वरूपांत नोंदले जातात. परदेशी प्रवास, वहातुक, विमा, गुंतवलेल्या रकमांवरील व्याज, इत्यादींमुळें निर्माण होणारीं देणीं घेणींहि विचारांत घ्यावीं लागतात. देणग्यांचे बाबतींतील व्यवहार पूर्णपणें एकतर्फी असतो; त्यांत देणें किंवा घेणें निर्माण होतें; देणें व घेणें दोन्हीं निर्माण होत नाहींत. वरील सर्व व्यवहारांना चालू खात्यावरचे व्यवहार म्हणतां येईल; उलट, गुंतवणुका आणि चलनविषयक सोनें ह्याविषयक देणीं-घेणीं भांडवली स्वरूपाचीं असतात. चालू खात्यावरील देण्याघेण्यांत वाढावा राहिला, तर इतर देशांत येणें निर्माण होतें किंवा जुनें देणें त्या प्रमाणांत कमी होतें; त्यांत तूट आली तर तेथील जिंदगी तेवढ्यानें कमी होते किंवा कर्जे वाढतात. भांडवली देण्याघेण्याच्या हिशेबानें देशाची परदेशाबाबत गुंतवणुकीची खरी परिस्थिति समजून येते. चालू खात्यावरील देण्याघेण्याच्या हिशेबांतूनच भांडवली हिशेब अखेर निर्माण होतो, आणि त्यावरून देश आपलें देणें कसें भागवीत आहे, ह्याची छाननी करून योग्य तें धोरण आंखतां येतें. देशाच्या परराष्ट्रीय देण्याघेण्याच्या हिशेबास ( बॅलेन्स ऑफ पेमेंट्स ) आतां विशेष महत्त्व प्राप्त झालेलें आहे. त्यावरून देशाचें चलनविषयक, नाणें विषयक, जकात-विषयक, व्यापारविषयक धोरण आंखण्यास मदत होते. बँकरेट-मध्यें बदल करतेवेळीं, ह्या हिशेबाची परिस्थिति ध्यानांत घेणें जरूरीचेंच असतें. आयातीवरील किंवा निर्गतीवरील कराचे परिणाम ह्या हिशेबावर होत रहातात. कोणत्या धंद्यामुळें पर-राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ होईल, ह्याकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें त्या धंद्याचा विकास घडवून आणतां येतो. 'बॅलेन्स ऑफ पेमेंटस्' वरून देशाची पत ओळखली जाते. "इंडियाज् बॅलन्स ऑफ पेमेंट्स १९४८-४९—१९५५-५६" ह्या रिझर्व्ह बँकेनें तयार केलेल्या पुस्तकांत ह्या संबंधांत तपशीलवार चर्चा केलेली असून त्या हिशेबाचा आठ वर्षांचा आढावा घेण्यांत आलेला आहे.

परराष्ट्रीय देण्या-घेण्याचा चालू खात्यावरील हिशेब ( १९४८-४९—१९५५-५६ )
( आकडे कोटी रुपयांचे )

| | १९४८-४९ | १९४९-५० | १९५०-५१ | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | १९५४-५५ | १९५५-५६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आयात | ७६६.३ | ६०३.९ | ६५०.३ | ९६२.९ | ६३३.० | ५९१.८ | ६८३.८ | ७५०.६ |
| निर्गत | ४८२.५ | ५१४.० | ६४६.८ | ७३०.१ | ६०१.९ | ५३९.७ | ५९६.६ | ६४१.४ |
| व्यापारांतील शिल्लक | -२८३.८ | -८९.९ | -३.५ | -२३२.८ | -३१.१ | -५२.१ | - ८७.२ | -१०९.५ |
| अदृश्य आयात-निर्गत | +३१.७ | +४२.८ | +४०.३ | +६४.९ | + ८०.५ | + ८०.५ | + ७७.४ | + ८४.४ |
| सरकारी देणग्या वगळून एकूण हिशेब | -२५२.१ | -४७.१ | +३६.८ | -१६७.९ | + ४९.४ | + २८.४ | - ९.८ | - २५.१ |
| सरकारी देणग्या | — | — | + २.१ | + ५.३ | + १०.८ | + १९.० | + १५.८ | + ४५.० |
| एकूण, चालू खातें | -२५२.१ | -४७.१ | +३८.९ | -१६२.६ | + ६०.२ | + ४७.४ | + ६.० | + १९.९ |

इंडेक्स नंबर १९५२-५३=१००

| | १९४८-४९ | १९४९-५० | १९५०-५१ | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | १९५४-५५ | १९५५-५६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आयात ( संख्या ) | १३५ | १२७ | ११२ | १४६ | १०० | ९५ | १०५ | ११४ |
| निर्गत ( संख्या ) | १०६ | ११२ | ११७ | ९५ | १०० | ९९ | १०२ | ११५ |
| आयात ( किंमतींनें ) | ७८ | ७७ | ८३ | ११५ | १०० | ९३ | ९१ | ९४ |
| निर्गत ( किंमतीनें ) | ८६ | ९१ | १११ | १५२ | १०० | ९४ | १०० | ९३ |
| देण्या-घेण्याची प्रत्यक्ष परिस्थिति | ११० | ११८ | १३४ | १३३ | १०० | १०१ | ११० | ९९ |

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## प्रमुख मालाची आयात व निर्गत

### १९४८-४९—१९५५-५६

( वार्षिक सरासरी, आंकडे कोटी रु. चे )

**आयात**

| माल | (१९४८-४९ ते १९५१-५२) | (१९५२-५३ ते १९५३-५४) | (१९५४-५५ ते १९५५-५६) |
|---|---|---|---|
| धान्य, डाळी | १३६·० | ११५·८ | ४२·९ |
| तेलें | ५९·१ | ८७·२ | ७६·४ |
| कपास | ९१·४ | ६४·८ | ५७·९ |
| ताग | ४६·७ | १५·४ | १६·२ |
| रसायनें, औषधें | २५·१ | २५·४ | ३४·५ |
| विजेचा माल व साहित्य | ११·४ | १४·४ | १३·५ |
| यंत्रसामुग्री | ९९·२ | ८८·९ | १०३·६ |
| लोखंड-पोलादाचा माल | १८·१ | २४·१ | ४८·७ |
| वहानें | २९·५ | २९·८ | ४६·९ |
| इतर | १९८·२ | १५५·४ | २२७·१ |
| एकूण | ७१४·६ | ६२०·९ | ६६७·५ |

**निर्गत**

| माल | (१९४८-४९ ते १९५१-५२) | (१९५२-५३ ते १९५३-५४) | (१९५४-५५ ते १९५५-५६) |
|---|---|---|---|
| चहा | ७८·८ | ९१·६ | १२८·५ |
| खनिज धातू | ९·४ | ३७·५ | २०·८ |
| तेलें | २०·५ | १७·० | ३०·९ |
| कपास | १९·१ | २४·२ | २९·८ |
| कातडीं | २९·० | २८·८ | २०·३ |
| कपास-कापड | ७९·५ | ७१·२ | ६५·३ |
| तागी माल | १६५·९ | १२२·० | १२१·३ |
| इतर | १७२·७ | १६१·९ | १६९·६ |
| एकूण | ५७४·८ | ५५४·० | ५९५·४ |

## भारताची परराष्ट्रीय देण्याघेण्याची परिस्थिति

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९४८-४९ ते १९५१-५२ | १९५२-५३ ते १९५३-५४ | १९५४-५५ ते १९५५-५६ |
|---|---|---|---|
| **चालू खातीं** | | | |
| चालू देवघेवी | −४३०·३ | +७७·८ | − ३४·९ |
| सरकारी देणग्या | + ७·४ | +२९·८ | +६०·८ |
| चुकांची दुरुस्ती | −−४३·७ | − २३·४ | − १७·४ |
| **भांडवली खातीं** | | | |
| खाजगी, दीर्घमुदतीं | − ६५·६ | − १८·२ | − १३·६ |
| खासगी, अल्पमुदती | + ०·२ | + १·४ | + ३·७ |
| सरकारी व बँकिंग दीर्घकालीन कर्जें | +८४·६ | + ३६·७ | + ४·१ |
| मिटवलेलीं देणींघेणीं | − ७·३ | − ६·१ | +१६·३ |
| इतर | −४०५·१ | − २·५ | − ०·३ |
| अल्पकालीन | +८५९·८ | − ९५·५ | − १८·७ |
| भांडवली हिशेबांत निघणारें देणें-घेणें | +४६६·६ | − ८४·२ | − ८·५ |

## ब्रिटिश उद्योगधंदे विस्कळित झाले

सुएझचा कालवा वाहतुकीस बंद झाल्यामुळें मध्यपूर्वेतील तेलाचा ब्रिटनच्या उद्योगधंद्यांना होणारा पुरवठा तुटला. त्यानंतर ब्रिटनमध्यें तेलाची वांटपपद्धति युद्धकालाप्रमाणें पुन्हां स्वीकारण्यांत आली. अमेरिकेकडून तेलाच्या पुरवठ्याचें आश्वासनहि मिळालें. पण, उद्योगधंद्यांना अडचणींनां तोंड द्यावें लागेल हें ठरल्यासारखेंच होतें. कित्येक कारखान्यांना तेलाचा पुरवठा बंद झाल्यामुळें आपलें काम बंद करावें लागत आहे. त्यामुळें अर्थातच बेकारींत वाढ होऊं लागली आहे. कांहीं कारखान्यांतून उत्पादन कमी करावें लागत आहे. अशा कारखान्यांचे मालक अनुभवी कामगारांना काढून टाकण्याच्या विरुद्ध आहेत. त्यांना असें वाटत आहे, कीं तेलाची टंचाई चार--दोन महिन्यांत संपेल. त्यांचा हा अंदाज खरा ठरला तर ठीकच. नाहींतर सर्वच परिस्थितीचा नव्यानें विचार करावा लागणार आहे. मजुरांच्या संघटनेच्या आर्थिक समितीचे सभासद ह्यासंबंधीं सरकारशीं वाटाघाटी करण्यास जाणार आहेत. दरम्यानचा उपाय म्हणून सरकार असें सुचवीत आहे कीं, कारखानदारांनीं रस्त्याच्या मार्गाऐवजीं वाहतुकीसाठी रेल्वेचा उपयोग करावा. पण ह्या सूचनेला कामगार व उद्योगपती ह्या दोघांचाहि विरोध आहे. साधारणपणें असा हिशोब आहे कीं, रेल्वेची वाहतूक रस्त्यावरील वाहतुकीपेक्षा तिप्पट महाग आहे. वाहतुकींत उत्पन्न झालेल्या अडचणींमुळें व इतर कारणांनीं कामगारांच्या रहाणीचा खर्चहि वाढला आहे. रहाणीच्या खर्चांत अशी वाढ होत गेली तर कामगारांना जादा वेतन मागावें लागेल. पण उद्योगपतींना तें देणें परवडणार नाहीं, अशी स्थिति आहे.


# पुणें सेंट्रल

# को-ऑपरेटिव्ह बँक लि.

लक्ष्मी रोड, पुणें शहर.

स्थापना : ४ सप्टेंबर, १९१७

दिनांक १ जानेवारी १९५७ पासून कायम ठेवींचे व्याजाचे दर वाढविले आहेत.

| मुदत | पूर्वींचा दर | नवा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | २ | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | $2\frac{1}{2}$ | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | — | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३ | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | ४ | ४ टक्के |

या बँकेंतील ठेवी मुख्यतः सहकारी शेतकी सोसायट्यांना भांडवलाचा पुरवठा करण्यासाठींच वापरल्या जातात.

अधिक माहिती पत्रद्वारें अगर समक्ष आनंदानें पुरवूं.

वा. ग. आळतेकर

मॅनेजिंग डायरेक्टर.

## बेळगांव बँकेंतील रिक्रिएशन क्लबचें उद्‌घाटन व वार्षिक दिनाचा समारंभ

### जिल्हाधिकारी, श्री. देसाई यांची रसिकता

"बँकांमधून काम करणाराच्या हातांत नेहमीं पैसा खेळत असला तरी तो दुसऱ्यांचा असल्यानें त्याचा नीट सांभाळ करून हिशोब ठेवतां ठेवतां त्यांना जीवनांतील साध्या करमणुकीसाठींहि सवड मिळत नसते. याकरितांच वर्षातून एक दिवस तरी बँकेचे भागीदार, ठेवीदार, व्यापारी व स्नेही यांनीं एकत्र येऊन मोकळेपणानें मनोरंजनाच्या कार्यक्रमांत भाग घ्यावा या हेतूनेंच वर्धापनदिनाचा समारंभ घडवून आणला आहे, इतकेंच नव्हे तर बँकेंतील स्टाफसाठी एक रिक्रिएशन क्लबहि चालविण्याचें आम्ही योजलें असून त्याचाहि उद्‌घाटन समारंभ आमचे सन्मान्य मुख्य पाहुणे श्री. देसाई, जिल्हाधिकारी यांच्या हस्तें व्हावयाचा आहे," असे उद्‌गार बेळगांव बँकेचे चेअरमन श्री. गोविंदराव सराफ यांनीं रविवार ता. २७-१-१९५७ रोजीं बँकेच्या दिवाणखान्यांत निमंत्रितांचें स्वागत करतांना काढले.

यानंतर श्री. विठ्ठलराव कोरगांवकर यांनीं चालविलेल्या रुक्मिणी संगीत विद्यालयातर्फे संगीताचा बहारीचा कार्यक्रम झाला. कुमारी लता शहा हिनें दोन भावगीतें व कुमार शहा यांच्या हार्मोनियम-वादनाचा छान कार्यक्रम झाल्यावर कुमारी किशोरी सराफ, बी. ए. हिनें ललीतागौरी रागांतील "प्रीतमसैंया" ही चीज आकर्षक रीतीनें आळविली व नंतर होरी, ठुमरी मधुर आवाजांत गाऊन सर्वांस लुब्ध केलें.

### श्री. देसाई ह्यांचें गौरवपर भाषण

बँक एजंट श्री. बाडगी यांच्या विनंतीनुसार रिक्रिएशन क्लबचें उद्‌घाटन करतांना जिल्हाधिकारी श्री. देसाई म्हणाले कीं, ऑफिसमध्यें काम करणाऱ्यांसाठी करमणुकीच्या व विश्रांतीच्या सोईची आवश्यकता नेहमींच असते. आरोग्याला जितकी नियमित कामाची तितकीच कामानंतर विश्रांतीची आवश्यकता असते. सध्यां आपल्या बँकेतर्फे पिंगपाँगसारख्या इनडोअर खेळाची व वाचनालयाची सोय होत आहे. त्याचबरोबर मोकळ्या हवेंतील व्यायामाची आवश्यकता सर्वांस आहे हें विसरून चालणार नाहीं. बेळगांव बँकेनें केलेल्या या प्रगतीपर सोईबद्दल मला फार आनंद होत आहे. संगीताच्या कार्यक्रमाबद्दल प्रत्येक कलाकाराचें कौतुक करून व क्लबतर्फे त्यांना भेटीच्या वस्तू देऊन रुक्मिणी संगीत विद्यालयाचे चालक व कलाकारांचे गुरु श्री. विठ्ठलराव कोरगांवकर यांना सन्मानार्थ पुष्पहार घालतांना "श्री. विठ्ठलरावांना मी लहानपणापासून ओळखतों. ते एक श्रेष्ठ कलाकार असून हार्मोनियममध्यें त्यांच्या तोडीचा वादक महाराष्ट्रांत सध्यां मिळणें कठीण आहे. माझें एथें मुंबईस अल्लादियाखांसारखे गवय्यासुद्धां विठ्ठलरावांची तारीफ करीत असत. श्री. बालगंधर्व तर "विठ्ठलरावांची पेटी गाते" असे उद्‌गार काढतात. असे श्रेष्ठ कलाकार बेळगांवांत आहेत त्याचें चीज बेळगांवच्या होतकरू तरुण वर्गानें करून घ्यावें एवढेंच मला वाटतें." असे आदराचे उद्‌गार श्री. देसाई यांनीं काढले.

त्यानंतर वंदेमातरम्‌ व अल्पोपहार झाल्यावर समारंभ आटोपला. सदरहू समारंभास बँकेचे हितचिंतक, व्यापारी व भागीदार मोठ्या संख्येनें हजर होते. तसेंच बेळगांवांतील संगीतज्ञ कागलकरबुवा, उत्तुरकरबुवा, पाच्छापूरकर, वगैरे हजर होते. तसेंच श्री. काळे, संपादक "अर्थ" यांचा शुभसंदेश आला होता.

### हंफ्रे बोगार्ट

हंफ्रे बोगार्ट हा सुप्रसिद्ध सिनेमा नट नुकताच मृत्यु पावला. त्यानें आपल्यामागें ५० लक्ष रुपयांची मिळकत ठेवली आहे. ती मिळकत ४ कोटी रुपयांपर्यंत असेल, अशा बातम्या प्रसृत झाल्या आहेत.

### जनता सहकारी बँक लि. ची शाखा

जनता सहकारी बँक लि. च्या शिवाजीनगर शाखेचा उद्‌घाटन समारंभ सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री. एफ्. एन्. राणा ह्यांच्या हस्तें दि. ३ फेब्रुवारी, १९५७ रोजीं झाला. शाखेचा पत्ता "दिलीप", घोले रोड चौक, पुणें ५, असा आहे.

### मोरेस ह्यांचें नेहरू-चरित्र

साहित्याच्या जागतिक क्षेत्रांत महत्त्वाची भर घालणाऱ्या व अमेरिकन जनतेच्या विचारांना विशेष चालना देणाऱ्या पुस्तकांची एक यादी अमेरिकन लायब्ररी असोसिएशन तयार करीत असते. १९५६ च्या अशा यादींत श्री. फ्रँक मोरेस ह्यांच्या नेहरू चरित्राचा समावेश झाला आहे.

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें १

(नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १)

विद्यालयाचा पुढील शिक्षणवर्ग दिनांक २ एप्रिल १९५७ पासून सुरू होईल. विद्यालयांत सुपरवायझर, बँकइन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी-विक्री संघ आणि विविध कार्यकारी सहकारी सोसायटी वगैरे संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाचे नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे. सहकारी सोसायट्यांत व सहकारी खात्यामध्यें नोकरी करणाऱ्यांना प्रवेश देतांना अधिक पसंति दिली जाते. शिवाय जागा शिल्लक असल्यास एस्. एससी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूं शकेल. सहकारी सोसायटींत काम करणारे उमेदवार एस्. एस्‌सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं सहकारी संस्थेंत कमींतकमी तीन वर्षे नोकरी केली असली पाहिजे. वरीलप्रमाणें शैक्षणिक लायकी असल्यास स्त्रियांनाहि प्रवेश मिळूं शकेल.

वर्गांतील शिक्षणाचे मुदतींत दरमहा रु. ४० प्रमाणें एकूण ८० विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यांत येईल आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचे वेळीं दरमहा रु. ३० प्रमाणें प्रवासभत्ता देण्यांत येईल. विद्यावेतन फक्त सहकारी खात्याचे व सहकारी संस्थांचे उमेदवारांना दिलें जाईल. खाजगी उमेदवारांना विद्यावेतन मिळणार नाहीं.

सहकारी संस्थांचे उमेदवारांनीं, आपल्या संस्थेच्या ठरावाचे नकलींसह प्रवेशअर्ज आपल्या जिल्ह्याचे, जिल्हा सहकारी बोर्डामार्फत, आमचेकडे दि. १० मार्च १९५७ पूर्वी पोहोंचतील अशा अंदाजानें पाठवावे. परस्पर आलेल्या व वरील तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाहीं. खाजगी उमेदवारांनीं आपले अर्ज परस्पर विद्यालयाकडे पाठवावे. प्रवेश-अर्जासोबत प्रवेश-फी पाठवूं नये. खाजगी उमेदवारांना प्रवेश मिळाल्यानंतर त्यांनीं विद्यालयाची फी रु. ४० ताबडतोब भरणें आवश्यक आहे.

विद्यालयाचे फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत सुटीचे दिवसांखेरीज रोज ११॥ ते ५ चे दरम्यान मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं आठ आणे रोख भरणें किंवा आठ आण्यांचीं पोष्टाचीं तिकिटें पाठविणें आवश्यक आहे.

मा. वि. मढाने,
सुपरिंटेंडेंट.

## कुळाला लेखी नोटीस देण्याची मुदत फेब्रुवारी अखेर आहे

### " कसणाऱ्याचा दिन " मात्र कायम

मालकाला स्वतः कसण्यासाठी किंवा बिगर-शेतकी कारणासाठीं किंवा वापरण्याकरितां जमीन हवी असल्यामुळें कुळवहिवाट बंद करावयाची असल्यास, अशा बाबतींत मालकानें कुळाला लेखी नोटीस देऊन तींत आपल्याला कोणत्या कारणासाठीं जमीन हवी आहे हें नमूद केलें पाहिजे आणि ही नोटीस ३१ डिसेंबर, १९५६ पूर्वी दिली पाहिजे, असें नवा कुळकायदा सांगतो. मुंबईच्या गव्हर्नरांनीं ऑर्डिनन्स काढून, ही नोटिसीची तारीख फेब्रुवारी अखेरपर्यंत वाढविली आहे.

१ एप्रिल, १९५७ हा दिवस सरकारनें " कसणाऱ्याचा दिन " म्हणून ठरविला आहे. त्या दिवशीं, कुळाकडे खंडानें असलेल्या व कूळ जातीनें कशीत असलेल्या जमिनी कुळांनीं खरेदी केलेल्या आहेत, असें समजण्यांत येईल. नोटिशीची मुदत फेब्रुवारी अखेर वाढविण्यांत आली असली, तरी " कसणाऱ्याचा दिन " कायमच राहील.

ऑर्डिनन्सनें इतर कांहीं कलमांतहि दुरुस्त्या केल्या आहेत.

---

### व्यवहारोपयोगी आण्विक घड्याळ

ॲटोमायक्रोन या नांवानें ओळखलें जाणारें हें आण्विक घड्याळ सुमारें ३०० वर्षांत ५ सेकंदापेक्षा अधिक मागें-पुढें जाणार नाहीं. अखेरीस त्यांत आणखी सुधारणा झाल्यानंतर तें इतकें बिनचूक चालेल कीं ३०,००० वर्षांच्या काळांत त्यांत एक सेकंदापेक्षा अधिक फरक पडणार नाहीं.

या नवीन घड्याळांत " लंबक " म्हणून सीझियम अणूचा उपयोग केला गेला आहे. दर सेकंदास ९ अब्ज, १९ कोटी, २० लक्ष मेगॅसायकल या कायम क्षिप्रतेनें त्याचीं आंदोलनें होत असतात. रेडिओच्या प्रेषकाप्रमाणें ( ट्रॅन्स्मिटर ) सीझिअम् अणूचा उपयोग करतां यावा म्हणून तो अणु एका निर्वात नळींत ठेवलेला असतो. रेडियोच्या ग्राहकाचें ( रिसीव्हर ) कार्य करणाऱ्या एका साधनाकडे तो अणु संदेश पाठवतो, आणि त्यामुळें, त्या अणूचीं आंदोलनें ज्या क्षिप्रतेनें होत असतात त्याच क्षिप्रतेनें ग्राहकाचींहि आंदोलनें होत रहातात.

अशा रीतीनें, छोट्या घड्याळांतील तोलाचें चाक किंवा मोठ्या घड्याळांतील लंबक याचें जें कार्य असतें तेंच सीझियम् अणूकडून साधलें जातें.

या घड्याळाचें वजन सुमारें ५०० पौंड आहे आणि याची किंमत ५०,००० डॉलर आहे. हें जवळ जवळ कायम चालू राहील. अशीं दहा घड्याळें आतांपर्यंत तयार करून विकलीं गेलीं आहेत.

मॉल्डेन, मॅसेचुसेटस् ( अमेरिका ) येथील " नॅशनल कंपनी "नें अनेक वर्षे सखोल संशोधन करून सुमारें १० लक्ष डॉलरच्या खर्चानें हें आण्विक घड्याळ पूर्णतेस आणलें आहे.

---

**योगाबद्दल संशोधन**—योगशास्त्राबद्दल संशोधन करण्यासाठीं दोन अमेरिकन डॉक्टर्स कलकत्ता येथें आले आहेत. समाधीच्या अवस्थेंत समाधिस्थ योग्याच्या मेंदूच्या व्यापाराची स्थिति काय असते, तें अजमावण्याचा प्रयत्न ते करणार आहेत.

**निवडणुकींतील मतदारांची संख्या**—भारताच्या येत्या सार्वत्रिक निवडणुकींत मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या गेल्या पांच वर्षांत जवळजवळ २ कोटींनीं वाढली आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकींत मतदारांची संख्या १७,३२,१३,२६५ होती. ह्यावेळेस ती १९,३१,४३,३२२ इतकी आहे. सगळ्यांत अधिक मतदार उत्तर प्रदेशांत आहेत. त्यांची संख्या ३.२७ कोटी आहे.

**आयातीवर निर्बंध**—इजिप्तच्या सरकारनें अमेरिकेकडून आयात करण्यांत येणाऱ्या मालावर निर्बंध बसविले असल्याचें समजतें. ह्यापुढें अगदीं जरूर अशाच प्रकारचा माल अमेरिकेकडून आयात करण्यांत येणार आहे. निर्बंधांबद्दल कांहीं कारणें देण्यांत आलेलीं नाहींत किंवा डॉलर्सच्या तुटवड्यामुळें ते घालण्यांत आले आहेत ह्यासंबंधीं खुलासाहि करण्यांत आलेला नाहीं.

**तेलासाठी नवीन नळ**—एका धनाढ्य ग्रीक बोट-मालकानें सुएझपासून पोर्टसैदपर्यंत कालव्याशीं समांतर असे तेलाचे नळ घालण्याची तयारी दाखविली आहे. सुएझमध्यें तेलाच्या बोटींनीं तेल उतरवावयाचें व पोर्टसैदमध्यें पुन्हां भरून घ्यावयाचें अशी ही योजना आहे. हें काम करण्यासाठीं अवघे १० महिने लागतील असें त्याचें म्हणणें आहे.

**प्रजासत्ताक दिनीं ८,००० पाहुणे**—दिल्ली येथें प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानें राष्ट्रपतींनीं भरविलेल्या स्वागतसमारंभांत दोन दिवसांत मिळून ८,००० पाहुण्यांनीं भाग घेतला. आमंत्रण मिळालेल्या लोकांत शिक्षक, सामान्य व्यावसायिक, शिपाई, इत्यादि सामान्य प्रतीचेहि लोक होते.

**कापडाच्या साठ्याचा खुलासा करा**—अहमदाबादमधील कापडाच्या १५ गिरण्यांना सरकारनें ठरवून दिल्यापेक्षा अधिक कापडाचा साठा केल्याबद्दल टेक्सटाइल कमिशनरनें खुलासा विचारला आहे असें समजतें. सरकारच्या ह्यासंबंधींच्या हुकमाप्रमाणें कापडगिरण्यांना ६ आठवड्यांच्या उत्पादनापेक्षा अधिक कापड साठवून ठेवतां येत नाहीं.

**कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सल्ला**—मुंबई येथील इस्माइल युसुफ कॉलेजचे प्रिन्सिपल श्री. बानर्जी हे पोद्दार कॉलेजमधील वक्तृत्वसभेंत बोलतांना म्हणाले कीं व्यापार-विषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीं वाङ्मयाचाहि चांगला अभ्यास करावा. कारण, अशा अभ्यासानें विचारांची अभिव्यक्ति स्पष्टपणें करतां येते.

**पाकिस्तानांतून येणारे यात्रेकरू**—अजमीर येथील प्रसिद्ध दर्ग्याच्या उरुसासाठी पाकिस्तानांतून मुसलमान यात्रेकरू दरसाल येत असतात. पाकिस्तान सरकारनें यात्रेकरूंच्या प्रीत्यर्थ भारतीय सरकारकडे आगाऊ अनामत रक्कम ठेवावी व त्यांना परतप्रवासाचीं तिकिटें द्यावीं अशी सूचना भारतीय सरकारनें केली होती. पाकिस्तानच्या सरकारनें सूचना मान्य केली आहे

**अहमदाबादची निवड होण्याचा संभव**—भारताच्या अणुशक्ति-मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें केंद्र भारतांत काढण्यांत येणार असल्याचें जाहीर केलें. अहमदाबाद शहर कोळशाच्या खाणींपासून बऱ्याच अंतरावर असल्यानें ह्या शहराची निवड केंद्रासाठीं होण्याचा संभव आहे.

## नवीं ग्रामीण आरोग्य केंद्रें

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आरोग्याच्यासाठी ग्रामीण विभाग विशेष लक्षांत घेण्याचें सरकारचें धोरण आहे. या योजनेंत ज्या अनेक समस्या आहेत त्यांत ग्रामीण आरोग्याची बाब विशेष महत्त्वाची मानून त्या वाटेनें सरकार आणखी थोडें पाऊल टाकणार आहे आणि म्हणून ३,००० नवीन आरोग्य केंद्रें ग्रामीण विभागांत स्थापन करण्यांत येणार आहेत. प्रत्येक केंद्राचा उपयोग ५०,००० च्यावर ग्रामीण जनता करून घेऊं शकेल. आरोग्य संरक्षणाबरोबर प्रसुति केंद्र, बाल आरोग्य केंद्र, स्वच्छता, लक्ष टोंचणें या बाबींचें शिक्षण देण्याचीहि व्यवस्था करण्यांत येईल. राज्य सरकारांस, विशेषतः मागासलेल्या विभागाकरतां मदत करण्याचा सरकारचा उपक्रम आहे. यासाठी ५,००,००० रुपये तरी खर्च येईल अशीं २०१ केंद्रें स्थापण्यांत आलीं आहेत. कुटुंबनियोजनाकरितां व संशोधनाकरितां आरोग्यखात्यानें ६५,००,००० रु. राखून ठेवले आहे. मुंबईच्या 'इंडियन कॅन्सर इन्स्टिटयूट'मध्यें साधनांची चांचणी घेण्याकरितां एक केंद्र उघडण्यांत आलें आहे. शिवाय चित्रपटादि इतर साहित्य पुरवठा ठिकठिकाणीं पुरविण्यांत आलाच आहे. दि टाटा ट्रस्ट फॉर सोशल सर्व्हिसेसच्या सहकार्यानें मुंबईंत एक लोकविज्ञान केंद्र उघडण्यांत आलें आहे. पहिल्या योजनेंत १२ मेडिकल कॉलेजें होतीं तीं दुसरींत ४२ एवढीं वाढलीं आहेत. भारताच्या आरोग्य खात्याकडे न्यूझीलंडनें कोलंबो योजनेनुसार १० लाख पौंड मदत केली असून त्यांतील प्रत्यक्ष मदत ६ लाख पौंड हातीं आली आहे. दिल्लीला ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स नांवाची संस्था स्थापन होत असून त्यासाठी ४७९.९३ लाख रुपये खर्च येईल असें वाटतें. या संस्थेंत एक मेडिकल कॉलेज, एक नर्सिंग होम, एक डेंटल कॉलेज, पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन केंद्र, ६५० खाटा, प्रात्यक्षिक कार्याकरितां ग्रामीण व शहरी संघटना, इ. चा समावेश असेल.

---

### उंच माणसांची संस्था

'फ्रँक फुर्ट क्लब फॉर टॉल पिपल' या नांवाची एक संस्था पश्चिम जर्मनींत स्थापन झाली असून तिचे सभासद एक हजार आहेत. हे सर्व सभासद उंचीनें मोठें आहेत. या क्लबच्या सर्वांत उंच सभासदाचें नांव हर हैन्स फ्लीनर्ट असून त्याची उंची ७ फूट, ४ इंच आहे. हर हैन्स फ्लीनर्टच्या नेतृत्त्वाखालीं, उंच माणसांना करांची सवलत देण्यांत यावी अशी चळवळ सुरू करण्यांत आली आहे. पण ती यशस्वी होणार नाहीं असें संस्थेच्या अहवालांत म्हटलें आहे. उंच माणसांना सवलतीबद्दल पुढील विचार मांडण्यांत आले आहेत: 'उंच माणसांना आपले कपडे, जोडे, इ. गोष्टींसाठी जास्त खर्च लागतो तेव्हां ही गोष्ट आकारणीचे वेळीं लक्षांत घेतली जावी.'

---

### कूळकायद्यांच्या प्रादेशिक आवृत्त्या

मुंबई सरकारच्या १८ डिसें. च्या गॅझेटच्या ४ ब मध्यें प्रसिद्ध झालेला १९५६ चा मुंबई कूळवहिवाट व शेतजमिनीबद्दलचा कायदा हिंदी, मराठी, गुजराथी भाषांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे. प्रत्येक पुस्तिकेची किंमत ३ आणे असून त्या गव्हर्मेंट बुकडेपो, चर्नीरोड गार्डन, मुंबई ४ येथें मिळतील.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. व्र. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हं | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.